प्रकल्प उtkarsh

महिला व बाल विकास
WOMEN & CHILD DEVELOPMENT
Government of Maharashtra

CAPRI GLOBAL CAPITAL LTD

VIPLA FOUNDATION

# हे तुम्हाला माहीत हवेच - सायबर गुन्हे

## सायबर गुन्ह्यांपासून लहान मुले तसेच प्रौढांचेही संरक्षण झाले पाहिजे. या ऑनलाईन गुन्ह्यांमुळे होणारे परिणाम आणि संबधित कायदे समजून घेतले पाहिजेत.

### लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण करणारा कायदा (POCSO) 2012

हा कायदा बालकांना गुन्ह्यांपासून संरक्षण देतो. ऑनलाईन गुन्ह्याही यात आहे.

- **कलम 11**: ऑनलाईन छळवणूकीसह लैंगिक छळाची व्याख्या आहे.
- **कलम 14**: पोर्नोग्राफिक हेतूंसाठी मुलांचा वापर केल्याबद्दल, तसेच त्या संबंधी सामग्रीचे वितरण केल्याबद्दल शिक्षेची तरतूद आहे.

### बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) कायदा, 2015 (JJ Act)

हा कायदा सायबर गुन्ह्यांसह गुन्हेगारी कृत्यामध्ये गुंतलेल्या अल्पवयीन (18 वर्षांखालील) बालकांसाठी आहे.

- **कलम 23**: बालकांना धोकादायक व्यवसायांतील रोजगारापासून प्रतिबंधित केले आहे. ऑनलाइन धोकादायक कामांचाही यात समावेश आहे.
- **कलम 74**: या कायद्याअंतर्गत कारवाई सुरू असलेल्या बालकांची ओळख गुप्त राखण्यासाठी हे कलम आहे.




### सायबर गुंडगिरी आणि छळ

भारतात वेगवेगळ्या प्रकारच्या सायबर गुंडगिरीसाठी वेगळे कायदे नाहीत, परंतु असलेल्या कायद्यांमधील तरतुदी ऑनलाइन छळ आणि गुंडगिरीसाठी उपयुक्त आहेत.

**भारतीय न्याय संहिता - (बी.एन.एस)**

- **भारतीय न्याय संहिता 2023 कलम 78/ (आय.पी.सी 354 ड)**: पाळत ठेवणे - इंटरनेट किंवा इतर कोणत्याही इलेक्ट्रॉनिक संपर्काच्या माध्यमातून एखाद्या महिलेवर पाळत ठेवणे.
- **बी.एन.एस - कलम 351 (4) / (आय.पी.सी 507)**: निनावी / स्वतःची ओळख लपवून गुन्हेगारी स्वरूपाची धमकी देणे.
- **बी.एन.एस - कलम 79 / (आय.पी.सी 509)**: गैरशब्द, गैर हावभाव किंवा इतर कृतीद्वारे स्त्रीचा विनयभंग करणे.

### तक्रार आणि कायदेशीर उपाय

सायबर गुन्ह्यांची तक्रार कशी करावी आणि कायदेशीर मदत कशी घ्यावी हे जाणून घ्या:

- **नॅशनल सायबर क्राइम रिपोर्टिंग पोर्टल**: www.cybercrime.gov.in हे भारतातील सायबर गुन्ह्यांची तक्रार नोंदविण्यासाठीचे विशेष पोर्टल आहे.
- **पोलीस**: सायबर गुन्ह्यांची तक्रार स्थानिक पोलीस ठाण्यांमध्ये करता येते.
- **हेल्पलाईन आणि सहाय्य सेवा**: अनेक संस्था कायदेशीर सल्ल्यासह सायबर गुन्ह्यांना बळी पडलेल्यांसाठी मदत आणि मार्गदर्शन करतात.

**हेल्पलाइन**: नॅशनल सायबर क्राईम रिपोर्टिंग पोर्टल

**सायबर क्राईम हेल्पलाइन नंबर - 1930**

**चाइल्ड हेल्पलाइन सेवा - 112**

## प्रत्येक मुलाला सुरक्षित आणि आश्वासक वाटेल असे पोषक वातावरण आपण एकत्रितपणे नक्कीच तयार करू शकतो.

**संकटात असलेल्या बालकांच्या मदतीसाठी हेल्पलाईन - 1098**

अधिक माहितीसाठी संपर्क : विपला फौंडेशन 022 -26520601
www.viplafoundation.org